**स.फौ.के. नं. १००/२०२४**

**नि. क्र. ०७ लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – देवेंद्र शांताराम लाड,

**वय** – ३४ वर्षे, **व्यवसाय** – रिक्षा चालक,

**राहणार** – देवरुख, पर्शरामवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u>** –

**०१.** दिनांक १९/०३/२०२४ रोजी मी देवरुख एसटी स्टँड येथे हजर होतो. तेथे पोलीसांनी मला त्यांच्याकडे बोलावून घेवुन माझी सही घेतली होती. (*साक्षीदारास घटनास्थळ पंचनाम्यावरील स्वाक्षरी पुरता भाग दाखविला*). त्यावर माझी सही नाही. पोलीसांनी माझी एका कागदावर सही घेतली होती. सही करण्यापूर्वी मी त्यातील मजकूर वाचला नव्हता. त्यावेळचे दुपारचे ०२:०० वाजले होते.

**(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, मी, पोलीस कर्मचारी व दुसरा पंच पर्शराम संजय असे आम्ही सर्वजन देवरुख–पर्शरामवाडी येथील डोंगराळ वहाळ भागात येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तेथे शिळयाचा पऱ्या लगत वाघधोंड या ठिकाणी आरोपी चार लाकडी बांबूवर प्लॅस्टीकचे छत घालून चुलीवर लोखंडी पत्र्याचे बॅरेल ठेवून गावठी हातभट्टीची दारु गाळत असताना आम्हाला दिसून आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातून एक लोखंडी पत्र्याचे गुळ व नवसागर मिश्रीत उकळकते रसायन, एक लाकडी चाटू, एक ॲल्युमिनीअमचे डेग भांडे, एक रबरी पाईप, तीन जळकी लाकडी विझवलेली, दोन २० लिटर मापाचे प्लॅस्टीकचे कॅन प्रत्येकी २० लिटर गावठी हातभट्टी दारुचे, २०० लिटर मापाचे कुजके रसायन असलेले ०२ बॅरेल व एक माती मिश्रीत कापडाची चिंधी असा मुद्देमाल पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की,

सदर कॅनमधील दारु, कुजके रसायन व गरम रसायन वेगवेगळया बाटल्यांमध्ये रासायनिक पृथःकरणाकरीता काढून घेतले व त्यावर माझ्या सहीचे लेबल लावले. हे म्हणणे खरे नाही की, तसा पंचनामा पोलीसांनी माझ्यासमक्ष केला व तो वाचून, पाहून बरोबर असल्याचे खात्री करुनच मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञा श्रीमती एस. ए. गिडये तर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. मांगले यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

**(श्रीमती आर. आर. कुलकर्णी)**

दिनांक –२५.०७.२०२५

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 25/07/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 25/07/2025 |
| Evidence uploaded on | : | 28/07/2025 |